**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१३</u>**
**<u>निशाणी ८७ पुढे सुरु</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>वादी तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांच्यामार्फत पुढील सरतपासः</u>–**

११. माझ्या शपथपत्रामधील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

१२. मी नि.क्र. ४/१ वर मालमत्ता क्र. ४३८ चा गाव नमुना ८ उतारा दाखल केला आहे. त्यावर सचिव, ग्रामपंचायत नया अंदुरा यांची सही आहे. (सदर दस्तास निशाणी देण्यास प्रतिवादी तर्फे आक्षेप नोंदविण्यात आला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, सदर दस्त मालकी हक्काचा दस्त नुसन फक्त महसुल गोळा करण्याकरीता देण्यात आलेला दस्त आहे. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्याला तपासल्याशिवाय त्यास निशाणी देता येणार नाही. त्यावर वादी तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर दस्तामध्ये वादीचे नावाची नोंद नि.क्र. ८९/१ वरील दस्तानुसार झालेली आहे व वादीने सदर मिळकत लिलावात घेतली आहे. त्यामुळे सदर दस्तास निशाणी देण्यात यावी. <u>आदेश</u> – दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला, वादीने यादी नि.क्र. ८९/१ वर नायब तहसिलदार, बाळापूर यांनी केलेल्या दिनांक २१.०५.१९९३ रोजीच्या आदेशाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सदर आदेशात अ.क्र. १९ वर मालमत्ता क्र. ४३८ वादीने लिलावात घेतली असल्याची नोंद नमुद आहे. त्या आदेशावरुन वादीचे नाव गाव नमुना ८ उताऱ्यावर नोंदविण्यात आले आहे आणि वादी यांनी यादी नि.क्र. ४/१ वर मालमत्ता क्र. ४३८ दस्त दाखल केलेला आहे. सदर दस्तावर सचिव, ग्रामपंचायत नया अंदुरा यांची सही व शिक्का आहे. भा.पु.का. कलम ७५ व ७६ प्रमाणे सक्षम अधिकाऱ्याने त्याच्या सही व शिक्यानिशी केलेला दस्त सार्वजनिक दस्ताची प्रमाणित प्रत असुन भा.पु.का. कलम ७९ अनुसार त्यास गृहितक लागु आहे. त्यामुळे प्रतिवादी तर्फे घेण्यात आलेला आक्षेप फेटाळण्यात येतो.) त्यास **नि.क्र. ९७** देण्यात येते.

१३. मी नि.क्र. ४/२ वर तलाठी, नया अंदुरा यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची सही व शिक्क्याची मुळ प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. ९८** देण्यात येते. मी नि.क्र. ४/३ वर तहसिलदार, बाळापूर यांना प्रतिवादी यांनी प्लॉट नं. ४३८ मधील झाड तोडल्यामुळे कारवाई होणेबाबत दिलेल्या दिनांक २८.०३.२०१३ रोजीच्या अर्जाची स्थळ प्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ९९** देण्यात येते. मी नि.क्र. ४/४ वर पोलीस ठाणे, उरळ यांचेकडे दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाची प्रथम खबरी अहवालाची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. १००** देण्यात येते. मी नि.क्र. ४/५ वर एकुण ३ छायाचित्रे दाखल केली आहेत. त्यांना एकत्रित **वस्तु नि. अ** देण्यात येते. मी नि.क्र. १६/१ वर २ छायाचित्रे दाखल केली आहेत, त्यांना एकत्रित **वस्तु नि. ब** देण्यात येते. मी.नि.क्र. ४९/१ वर दिनांक १९.०४.२०२२ रोजीची एकुण ५ छायाचित्रे दाखल केली असुन त्याला एकत्रित **वस्तु नि. क** देण्यात येते. मी नि.क्र. ४९/२ वर दिनांक २०.०४.२०२२ रोजीची कुण २ छायाचित्रे दाखल केली असुन त्याला एकत्रित **वस्तु नि. ड** देण्यात येते. मी नि.क्र. ४९/३ वर दिनांक २२.०४.२०२२ रोजीची एकुण ३ छायाचित्रे दाखल केली असुन त्याला एकत्रित **वस्तु नि. ई** देण्यात येते. मी नि.क्र. ४९/४ वर दिनांक २३.०४.२०२२ रोजीची एकुण २ छायाचित्रे दाखल केली असुन त्याला एकत्रित **वस्तु नि. फ** देण्यात येते.

१४. मी नि.क्र. ७२/१ वर सरपंच, ग्रामपंचायत नया अंदुरा यांनी दिलेला दिनांक १३.०६.२०२१ रोजीच्या दाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. १०१** देण्यात येते. मी नि.क्र. ८९/१ वर नायब तहसिलदार, बाळापूर यांनी पारित केलेल्या दिनांक २१.०५.१९९३ रोजीच्या हर्रासीबाबतच्या आदेशाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र. १०२** देण्यात येते. मी नि.क्र. ८९/२ वर हर्रास पट्टीची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. १०३** देण्यात येते. सदर हर्रास पट्टीवर अ.क्र. १९ वर मी दावा मिळकतची सर्वात जास्त बोली लावलेली असल्यामुळे हर्रासी स्विकृत करण्याचा शेरा नमुद आहे.

वादी तर्फे विधिज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांनी यादी नि.क्र. ४९/५ वरील दस्त शोधुन मिळाल्यास सदर दस्तावेज दाखल करणार असे न्यायालयास सांगितले म्हणुन त्यांच्या विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.02.15 11:01:38 +0530

दिनांक : १४/०२/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.